# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.०८/०६/२०२३

आरोपी इतर लोकसेवक विजय यादव राउत, वय–३३ वर्ष, व्यवसाय नोकरी, तांत्रीक अधिकारी (कंत्राटी), पंचायत समिती वाशिम रा.माधव नगर लाखळा, सोनखास रोड वाशिम ता.वाशिम जि.वाशिम लाच रक्कम ५,००० रुपयाचा मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली, सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्यावर संशय आल्याने ईलोसे यांनी लाच रक्कमेचा स्विकार केला नाही. यावरुन आरोपीस ताब्यात घेवून त्याचे विरुध्द लाच मागणीचा गुन्हया दाखल करण्याचे कारवाई करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | आरोपी इतर लोकसेवक विजय यादव राउत, वय–३३ वर्ष, व्यवसाय नोकरी, तांत्रीक अधिकारी (कंत्राटी), पंचायत समिती वाशिम रा.माधव नगर लाखडा, सोनखास रोड वाशिम ता.वाशिम जि.वाशिम |
| लाच मागणी रक्कम | ५,०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे वडीलांचे खात्यात विहीरीचे अनुदानाचा पहीला टप्पा जमा करण्याकरीता ५०००/–रुपये लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | श्री गजानन शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.०६/०६/२०२३ रोजी तक्रारदार पुरुष वय २७ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांच्या वडीलांचे खात्यात विहीरीचे अनुदानाचा पहीला टप्पा जमा करण्याकरीता लाच मागणी केली आहे. त्यावरुन दि. ०७/०६/२०२३ रोजी ५,०००/– रुपयाची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. दि. ०८/०६/२०२३ रोजी सापळा कारवाई दरम्यान ईलोसे यांना तक्रारदार यांच्यावर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कमेचा स्विकार केला नाही. परंतु लाच मागणी स्पष्ट निष्पन्न झाल्याने आरोपीविरुद्ध सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री देविदास घेवारे, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती यांचे मार्गदर्शनात तपसी अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री गजानन आर शेळके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे पथकातील कर्मचारी पोहवा नितीन टवलारकर, विनोद अवगळे, विनोद मारकंडे, पोना योगेश खोटे यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक –९४२३३३८४२४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन श्री गजानन शेळके, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो वाशिम

8/6/23

(गजानन शेळके)
पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.